RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On : 12 March 2016 :: Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 March, 2016

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : तेरा | अंक : नऊवा | मार्च २०१६



महरम होए सो जाने (भजन) 4

सतगुरूच शिष्यास शोधतात (सत्संग) 5

अमृतवेळ (संदेश) 29

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहीती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

महरम होए सो जाने

संत कबीर साहेबांनी रचलेले भजन

महरम होऐ, सो जाने, साधो,
ऐसा देश हमारा, साधो, ऐसा देश हमारा, (२)

१. वेद–कतेब, पार नहीं पावत, (२)
कहन–सुनन से न्यारा, साधो ऐसा देश...

२. जात वर्ण कुल, क्रिया नाहीं, (२)
संध्या नेम उचारा, साधो, ऐसा देश...

३. बिन जल बूँद, परत यहाँ भारी (२)
नहीं मीठा नहीं खारा, साधो, ऐसा देश...

४. सुन्न महल में, नौबत वाजे, (२)
किंगरी बीन सितारा, साधो, ऐसा देश...

५. बिन बादल यहाँ, बिजली चमके (२)
बिन सूरज उजियारा, साधो, ऐसा देश...

६. बिना सीप यहाँ, मोती उपजे, (२)
बिन सुर शब्द उचारा, साधो, ऐसा देश...

७. जोत ले जाए, ब्रह्म यहाँ दरसे, (२)
आगे अगम अपारा, साधो, ऐसा देश...

८. कहो 'कबीर' वहाँ, रहन हमारी, (२)
बूझे गुरु मुख्तदारा, साधो, ऐसा देश...

सतगुरूच शिष्यास शोधतात

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, हुज़ूर स्वामीजी महाराजांची वाणी, बेंगलोर, कर्नाटका – ४ जुलै १९८७



मी दयाळू सतगुरू बाबा सावन सिंहजींचे आभार मानतो. आपण कलियुगात आपले निजधाम सोडून आलात जेथे जन्म–मृत्यु नाही, दु:ख नाही. तो शांतीचा देश आहे. कबीर साहेब सांगतात:

महरम होय सो जाने साधो ऐसा देश हमारा।

जे साधू त्या शांतीमय देशात पोहचलेले असतात त्या परमात्म्याच्या प्रियजनांना परमात्मा आदेश देतो की संसारात आत्मा तळमळत आहेत, त्या आत्म्यांची तुम्ही समजूत घाला, माझ्याशी जोडून त्यांना माझ्याकडे घेऊन या. ते सच्चाखंडातील सुखांचा त्याग करून आपल्याकरिता ते शरीर धारण करून या संसारात येतात. संतांची मर्जी असेल तर ते एखाद्या निर्जीव लाकडाद्वारेही काम करून घेण्यास समर्थ असतात. शिष्य त्यांपासून किती दूर वा समीप आहेत याचा त्यांच्या कार्यावर काहीच परिणाम होत नाही.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''जे प्रेमी असे म्हणतात की आम्ही स्वत: संतांकडे जातो, नाम जपतो वा आम्ही नाम घेतले आहे, ते असे तोपर्यंतच म्हणतात जोपर्यंत त्यांचे आंतरिक नेत्र उघडत नाहीत. खरे तर जीवामध्ये एवढी शक्ती कुठे असते? जेव्हा आंतरिक नेत्र उघडतात, तेव्हा जीवास आकलन होते की आपण स्वत: सत्संगात जात नव्हतो, संतांकडे आपण जाऊ शकत नव्हतो. वास्तविकत: संतांनीच आपणांस स्वत:कडे आकर्षून घेतले व सत्संगाद्वारे आपल्यावर प्रेमाचा वर्षाव केला.''

बाबा सावन सिंहजी महान होते, त्यांच्या महिमेचे वर्णन शब्दात केले जाऊ शकत नाही. त्यांनी कृपा करून या गरीब आत्म्यास बालपणीच स्वत:चे स्वरूप दाखविले. आयुष्यभर ते स्वरूप मी माझ्या नजरेपासून दूर करू शकलो नाही. मी एका भजनामध्ये म्हटले आहे:

लक्खां शक्लां तकियां अखिंया नें कोई नज़र मेरी विच खुबदी ना।

तुमच्या चेहऱ्यासमान आकर्षक, मनमोहक दुसरा एकही चेहरा मला दिसला नाही. ही त्यांचीच कृपा आणि महिमा होती. त्या कृपेचे वर्णन कसे बरे आपण करू शकतो? त्यांनी कृपा केली व दक्षिणेकडील विभागात बाबा सोमनाथजींना सेवा प्रदान केली की तुम्ही तेथील आत्म्यांना शब्द-नामाशी जोडावे. ज्यांना तुम्ही शब्द-नामाशी जोडाल त्यांचा मी सांभाळ करीन.

महाराज सावन सिंहजी सांगत असत की सतगुरू त्यांच्या जीवनकाळात ज्याला सांगतात की तू ज्यांना नाम देशील त्यांचा मी सांभाळ करीन, त्यांची जबाबदारी ते घेतात. याचप्रमाणे आमच्या राजस्थानमधील एका लहान विभागामध्ये, बागड येथे बलुचिस्तानी मस्तानाची ड्यूटी लावली होती. बलुचिस्तानी मस्तानाने महाराज सावन सिंहजींचे खूप गुणगान केले. याचप्रमाणे हुजूर कृपालजींची सकल जगामध्ये ड्यूटी लावली. संतांना कल्पना असते की कोणाद्वारे किती आणि कशारितीने काम करवून घ्यायचे आहे. हा गुरू आणि शिष्यांमधील विषय असतो.

त्याचप्रमाणे महाराज कृपाजींनी सकल जगामध्ये, मग कोणी समुद्रकिनारी तर कोणी पर्वत शिखरावर बसलेला असो, सर्वांकडे जाऊन महाराज सावन सिंहजींच्या नामाचा जप करविला, त्यांचे नाव जगामध्ये उज्वल केले. ही त्यांचीच कृपा व थोर महिमा होती ज्याचे आपण शब्दात वर्णन करू शकत नाही. आज आपण त्याच महाराज सावन सिंहजींच्या कृपेने त्यांच्या प्रेमात एकत्र जमलेलो आहोत. त्यांनी जर आपल्यावर कृपा केली नसती, आपल्यावर प्रेमाचा वर्षाव केला नसता, तर आपण कसे बरे एकत्र होऊ शकलो असतो?

तुम्हांस कल्पना आहे की कलियुगामध्ये जीवांचे लक्ष कशारितीने सर्वत्र विखुरलेले आहे. आपण एक तासदेखील मांडी घालून शांतचित्ताने बसू शकत नाही, सतत हालचाल करीत रहातो व आपले लक्ष वारंवार बाह्य जगाकडे ओढले जाते. एक क्षणही आपण एकाग्र होऊ शकत नाही. घरा–दाराच्या बेड्या आपल्या पायांमध्ये पडलेल्या आहेत. आपल्या कर्मांमुळेच आपण देवाण–घेवाणीमध्ये अडकलेलो आहोत. आज त्यांच्या कृपेनेच आपण महान सतगुरूंच्या आठवणीत बसलेलो आहोत. आपणांस त्या दयेचा पुरेपूर फायदा करून घ्यावयास हवा.

गुरू नानकदेवजी महाराज सांगतात की, तुम्ही कितीही विद्वान असाल, पोहण्यात पारंगत असाल, पोहत नद्या ओलांडण्याची तुमच्यात क्षमता असेल, तरीदेखील तुम्हांस कोणत्या ना कोणत्या पोहणाऱ्या माणसाच्या अनुभवाचा उपयोग करून घ्यावा लागेल, कारण समुद्राच्या लाटांमध्ये, नदीच्या पाण्यातील भोवऱ्यांमध्ये मोठ–मोठे पटाईत पोहणारे बुडतात. याचप्रमाणे हे जग समुद्राप्रमाणेच आहे. यामध्ये प्रचंड लाटा निर्माण होत असतात. कोठे काम–वासनेची, कोठे क्रोधाची तर कोठे मान–मोठेपणाची लाट निर्माण होत असते. या भोवऱ्यांमधून बाहेर पडणे सोपे नाही. एखादा शूर व धाडसी मनुष्यच त्यामधून बाहेर पडू शकतो, मनाशी संघर्ष करू शकतो. त्यामुळे आपणदेखील एखाद्या अशा तरणपटूच्या शरणी जावे, जो आपणांस या जगामधील भोवऱ्यांपासून आपला

बचाव करून पुढे घेऊन जाईल. जो स्वत: पोहून नदीपार गेलेला असेल तोच आपणांस पार करवू शकेल. हुजूर सांगत असत,''सुशिक्षित मनुष्यच आपणांस शिकवू शकतो. पहिलवानच पहिलवानकी करण्यास शिकवू शकतो.''

याचप्रमाणे नारदास देवाचे मन म्हणून संबोधले गेले आहे. नारद शिरोमणी भक्त होता. इतिहासात नोंद आहे की नारदाने साठ हजार वर्षे तपश्चर्या केली. तपश्चर्या करून नारद ब्रह्माकडे गेला तेव्हा ब्रह्मा म्हणाला,''या ऋषी बसा! कसे आहात? बऱ्याच कालावधीनंतर तुमचे दर्शन होत आहे.'' आपण जी काही बाह्यजगातील तप व कर्मकांडे करतो त्याने आपल्या मनास शांती लाभण्याऐवजी आपणांस अहंकार येतो. महाराज सावन सिंहजी सांगत:

किया कराया सब गया जब आया अहंकार।

ब्रह्माने विचार केला की याने तपश्चर्या केली, परंतु याचा अहंकार काही दूर झालेला नाही. नंतर नारद शंकराकडे गेला. शंकराने देखील नारदाचा आदर-सत्कार करीत म्हटले,''भक्तजी बसा! तुमचे दर्शन करून खूप काळ लोटला.'' नारद म्हणाला, ''मी खूप तपश्चर्या केली असून मन इंद्रियांवर मी ताबा मिळविलेला आहे. आता मला तुमच्यासारख्या देवांकडे येण्याची काय गरज आहे? मी स्वर्ग-वैकुंठापर्यंत जाऊ शकतो.'' शंकराने विचार केला की याच्या अंतरामध्ये खूप अहंकार आला असून, विष्णू देवाकडे जाऊन हेच विचार त्याने मांडू नयेत.

नारद जेव्हा विष्णू देवाकडे गेला, तेव्हा विष्णू देखील म्हणाला,''या भक्तजी बसा! तुम्ही कसे आहात? बऱ्याच कालावधीनंतर तुम्ही आला आहात.'' नारद म्हणाला,''मी मन-इंद्रियांवर विजय प्राप्त केलेला आहे, काम-वासनेवर ताबा मिळविलेला आहे. मी स्वर्ग-वैकुंठामध्ये जात असल्याने, आता तुमच्याकडे येण्याची मला गरज काय आहे?'' विष्णूने विचार केला, अहंकाराच्या आहारी जाऊन हा आपल्या तपश्चर्येचेही नुकसान करीत आहे. हा वहावत असून, याचे रक्षण करणे खूप गरजेचे आहे.

विष्णूने मायेस इशारा करून सांगितले की पुढे जाऊन एका नगराची रचना कर आणि तेथे असे-असे घडवून आण. विनालंब मायेने एका नगराची रचना केली. त्या नगराच्या राजाने त्याच्या राजकन्येचे स्वयंवर आयोजित केले होते. नारद त्या राजाच्या महालात गेले. महान ऋषी आले आहेत या भावनेने राजाने त्यांचा खूप आदर-सत्कार केला व म्हणाला, ''माझ्या मुलीचा विवाह आहे, तेव्हा तुम्हीदेखील तेथे उपस्थित रहा.'' नारदाने विचार केला की पाहू तरी कन्या कशी आहे! कन्येस पाहण्यासाठी गेले असता, त्यांनी पाहिले तिच्या हातावर असे लिहिले होते की, हिच्याशी जो विवाह करेल, तो कायमस्वरूपी अमर होईल.

नारद उच्चशिक्षित विद्वान होते, त्यांनी ते वाचले, तेव्हा त्यांच्या हृदयात तात्काळ विचार आला की एकाच खड्यात दोन पक्षी साधले जात आहेत. आपला विवाह होईल, सोबत अमरदेखील होऊ. लागलीच मनाने आतून विचार उत्पन्न केला की तपश्चर्या करूनही हे प्राप्त झाले नव्हते, हे तर खूपच सोपे काम आहे. नारद तात्काळ विष्णूकडे गेला आणि म्हणाला,''तुम्ही मला तुमचे सुंदर स्वरूप प्रदान करा, जेणेकरून राजकन्येने मला पसंत करावे व तिने माझ्याशीच विवाह करावा.''

विष्णूने विचार केला, भलेही नारद नाराज होवो, परंतु भक्तास वाचविणे हे देवाचेच कर्तव्य असते. त्यांनी नारदाचा चेहरा वानराच्या चेहऱ्याप्रमाणे बनविला. स्वयंवरात नारद वारंवार त्या राजकन्येस आपला चेहरा दाखवी. त्याला वाटले की आपण सुंदर असल्याने आपल्यासच पसंत केले जाईल. आपण सर्व जाणतो की कुरूप चेहऱ्याकडे कोण पाहतो? तेथे शंकराचे दोन गण बसलेले होते. ते नारदास म्हणाले, ''सज्जन मनुष्या! तू जाऊन स्थिर पाण्यात स्वत:चा चेहरा कसा आहे हे तरी पहा!'' जेव्हा नारदाने स्वत:चा चेहरा पाहिला, तेव्हा तो खूप दु:खी व क्रोधीत झाला. विष्णूकडे जाऊन नारद रागाने म्हणाला, ''तुम्ही माझी थट्टा-मस्करी केली आहे.''

विष्णू म्हणाले,''नारदा! तू मला भले काहीही म्हण, परंतु मला माझे भक्त खूप प्रिय आहेत. मला तुझा अहंकार दूर करायचा होता. आपल्या व परमात्म्याच्या दरम्यान जर कसला अडथळा असेल तर तो आपल्या मनाचा आहे. मन आपल्या अंतरात बसून अहंकार निर्माण करते व अहंकार आपल्या अंतरात एक अडथळा बनून भिंतीप्रमाणे उभे रहाते. गुरू नानकदेवजी सांगतात:

हौमें दीर्घ रोग है दारू भी इस माहे।
कृपा करे जे आपणी गुरू का शब्द कमाहे।।

अहंकार मधुमेहासारखा एक अतिशय मोठा आजार आहे ज्यावर इलाज नाही. परंतु परमात्म्याने आपल्यावर दया करून त्याचे औषधही आपल्या अंतर्यातच ठेवले आहे. परमात्मा ज्यांचे रक्षण करू इच्छितो, स्वत:शी भेटवू इच्छितो, त्यांना तो संत–महात्मा व सतगुरूंच्या संगतीत पाठवितो. संत–महात्मे आपली सुरत शब्द–नामाशी जोडतात. त्यांच्या दयेनेच आपण जगरूपी भवसागरातील लाटा पार करून जातो. संत–महात्म्यांची संगत आणि सानिध्य अतिशय मौल्यवान व दुर्लभ रत्न आहे.

या जगात प्राप्त करून घेण्यासारखी कोणती वस्तू असेल तर ती म्हणजे सतगुरूंची शरणागती होय. मृत्युसमयी आपल्या सोबत आई–वडील, बंधु–भगिनी कोणीही जात नाही. आपण या संसारात धन–संपत्ती कमावून अहंकार करतो किंवा जात–धर्माचे पुढारीपण प्राप्त करून विचार करतो की आपल्या समान कोण आहे? आपण सर्वांस आपल्या काबूत ठेवू शकतो.

महात्मा सांगतात की मृत्युसमयी यांपैकी कोणीही आपली मदत करू शकत नाही, आपल्या सोबत जाऊ शकत नाही. मृत्यू येतो तेव्हा आपली मुले शेजारीच बसून असतात, परंतु ती आपले यमदूतांपासून रक्षण करू शकत नाही. राजा असल्यास त्याच्या शेजारी पहारेकरी हातामध्ये बंदुका घेऊन उभे असतात, परंतु कर्दनकाळ कधी महालामध्ये येतो याची कल्पनाही येत नाही. तो आतूनच आत्म्यावर ताबा मिळवितो. गुरू नानकदेवजी सांगतात:

कच्चड़यां सो तोड़ दोस्ती ढूंढ सज्जण सन्त पकयां।

संसारिक नाते–संबंध आप–आपल्या स्वार्थासाठीच असतात. तुमच्या समोर स्वामीजी महाराजांची वाणी सादर केली जात आहे:

सतगुरु खोजो री प्यारी। जगत में दुर्लभ रतन यही।

सर्व संत–महात्मे हेच सांगत आले आहेत की सतगुरू आणि नाम दुर्लभ आहेत. नाम उत्तम साधन आहे, सतगुरूंशिवाय नाम मिळत नाही आणि नामाशिवाय मुक्ती मिळत नाही.

आपणांस कल्पना आहे की आपल्या वैज्ञानिकांनी जगात अनेक मोठ–मोठे शोध लावले आहेत, ज्यांचा उपयोग सर्वांना होत आहे. ज्या प्रवासासाठी आपणांस महिनों–महिने लागत असत, तोच प्रवास आपण आधुनिक प्रवासाच्या वाहनांमुळे काही तासांमध्ये पूर्ण करतो. याव्यतिरीक्त इतर अनेक वैज्ञानिक शोधांचा आपणांस फायदा होत आहे. परंतु त्यासोबत मनुष्याने एक असाही शोध लावला आहे ज्यायोगे त्याने स्वत:च्याच विनाशाची तयारी करून ठेवली आहे. मनुष्याने अणुबाँब तयार केला. ज्याच्याकडे अणुबाँबचे भांडार आहे, त्यास अभिमान वाटतो की आम्ही हवं तेव्हा संपूर्ण जगाचा विनाश घडवू शकतो. हा देखील आपल्या संशोधनाचाच परिणाम आहे. कारण याची निर्मितीसुद्धा संशोधनातूनच झालेली आहे.

महात्मा आपणांस सांगतात की आपण अंतर्यात जाऊन शब्द–नामाचा शोध घ्यावा, प्रभु–परमात्म्याचा शोध करावा, जो आपल्या अंतर्यातच बसलेला आहे. त्यामुळे आपण स्वत:ही शांत होऊ, तसेच आपल्या आजू–बाजूस असलेल्या लोकांनाही शांती मिळावी म्हणून आपण प्रयत्न करू. एखाद्याचे हृदय दुखविण्यापेक्षा मोठे कोणते पाप नाही, तर एखाद्यास शांती मिळवून देण्यापेक्षा मोठा कोणता धर्म नाही.

जिन पर मेहर दया सतगुरु की। उनको दर्श दई।।

मी सतसंगाच्या सुरूवातीसच म्हटले होते की आपणांस असे वाटते की आपण स्वत:हून संतांकडे जातो, त्यांचे दर्शन करतो. प्रियजनहो! ज्या महात्म्यांचे आंतरिक नेत्र उघडलेले असतात, ते सांगतात की संत स्वत:च त्यांच्या दर्शनाची आपल्यासाठी व्यवस्था करतात. त्यांनी स्वत:ची व्यवस्था केली नाही तर आपण त्यांचे दर्शन करूच शकत नाही.

मी स्वत:बद्दल सांगत असतो की मी कशा प्रकारे बाबा सावन सिंहजींच्या शरणी गेलो? मी सैन्यात नोकरी करत होतो. पेशावर जवळच नशहरा येथे सैन्याची छावणी आहे. तेथे काही पठाण आमच्या सैन्यामध्ये दात घासण्याच्या काड्या विकण्यासाठी येत असत. एके दिवशी सकाळी दोन पठाण काड्यांची विक्री करता–करता आपसात प्रेमाने चर्चाही करीत होते की पंजाबमधून कोणी महात्मा आले असून, त्यांचा चेहरा खूपच मनमोहक आहे. त्यांच्या अध्यात्मिक शक्तीबद्दल तर काही सांगू शकत नाही, परंतु त्या महात्म्यांचे स्वरूप आणि त्यांची दाढी खूपच आकर्षक आहे. त्यांना पाहताच असे वाटते की साक्षात गुरू नानकच स्वत: जगात अवतरले आहेत.

तेथे इतर अनेक लोक दात घासण्याच्या काड्या विकत घेत होते, आजूबाजूस उभे होते. परंतु त्यांपैकी कोणीही त्याबद्दल काही प्रश्न विचारला नाही. परंतु या गरीब आत्म्यानेच प्रश्न विचारला की ते महात्मा कोठे आहेत? त्यांची भेट कशी होऊ शकेल? त्यांनी सांगितले की ते महात्मा पेशावर येथे आलेले आहेत. तुम्हा सैनिकांना ते भेट घेण्यासाठी नेहमीच प्राधान्य देतात. कारण बाबा सावन सिंहजींनी स्वत: सैन्यामध्ये नोकरी केली असल्याने त्यांना कल्पना होती की सैनिकांना महत्प्रयासाने वेळ मिळतो. सैनिकांच्या वेळेस ते खूप महत्त्व देत असत.

आमचा अधिकारी धार्मिक विचारांनी भारलेला होता. तो नेहमी साधू–संतांच्या भेटीच्या शोधात असे. मी त्या अधिकाऱ्यास सांगितले की आज पठाणांच्या मुखातून अशाप्रकारची एका महात्म्यांची प्रशंसा मला ऐकावयास

मिळाली. तुम्ही जर त्या महात्म्यांच्या भेटीची व्यवस्था केली तर खूप बरे होईल, कारण तुम्ही आमचे अधिकारी असून आम्ही तुमचे कनिष्ठ आहोत. आमचा अधिकारी म्हणाला, ''नाही! महात्म्यांच्या दर्शनासाठी आपण सर्वजण एकसमान आहोत. हा तर आप-आपल्या आत्म्याच्या निर्मळतेचा प्रश्न आहे.'' पेशावर येथे जाऊन आम्ही बाबा सावन सिंहजींना भेटलो. जेव्हा त्यांना मी सांगितले की, बाबाजी! पठाण म्हणत होते की तुम्ही खूप सुंदर आहात. तेव्हा बाबाजी हसले आणि म्हणाले,''संत सुंदर रूप धारण करूनच येतात. परंतु पुढे परिपूर्ण संतांची ओळख पटणे किंवा त्यांच्यावर प्रेम करणे हे जीवाच्या भाग्यावर अवलंबून असते.''

याचप्रमाणे महाराज कृपालजींच्या संबंधी मी सांगत असतो की मला आयुष्यात ना कोणी त्यांचा प्रशसंक भेटला होता ना कोणी निंदक भेटला होता. माझ्यावर दया करून ते स्वत:च पाचशे किलोमीटर अंतराचा प्रवास करून आले. त्यांनी त्यांचा एक निरोप्या माझ्या घरी पाठविला, ज्याने मला निरोप दिला की तुम्ही घरीच थांबावे, महाराजजी तुम्हांस भेटण्यासाठी येत आहेत. जेव्हा त्या प्रेमीने मला सांगितले की महाराजजी तुम्हांस भेटावयास येत आहेत, ते ऐकून माझ्या आनंदास पारावर उरला नाही.

या घटनेच्या सहा महिन्यांपूर्वी माझ्या हृदयात असा विचार स्फुरला की महाराजजी येणार आहेत तेव्हा आपण एक घर बांधावे. त्यावेळी माझ्या सोबत रात्रं-दिवस घर बांधण्याची सेवा करून मला सहयोग देणारे प्रेमी अजूनही जिवंत आहेत आणि या सत्संगातही बसलेले आहेत. घराचे काम रात्रं-दिवस सुरू होते. आम्ही रात्रीच्या वेळी गॅस-बत्तीच्या प्रकाशात काम करीत असे. कारण घर शेतामध्ये असल्याने तेथे विजेची सोय झाली नव्हती. ते घर जेव्हा पूर्ण झाले, तेव्हा प्रेमींना मी सांगूही शकत नव्हतो की महाराजजी कोण आहेत आणि ते कोठून येणार आहेत. जेव्हा ते साक्षात सहा फूट उंच महाराज आले, तेव्हा मला जाणवले की ते चालते-फिरते

परमात्मा होते, जे बोलू शकत होते, सांगू शकत होते. ते परमात्मा या आत्म्याजवळ पोहचले.

याचप्रमाणे महाराज सावन सिंहजी, बाबा जयमल सिंहजींकडे स्वत: गेले नव्हते. बाबा जयमल सिंहजींनी खूप लांबचा प्रवास करून, कोहमरीच्या पर्वतांवर महाराज सावन सिंहजींना शोधले व त्यांना नाम दिले. महाराज सावन सिंहजी सत्संगात सांगत असत की बाबा जयमल सिंहजी आणि बीबी रूक्को त्यांच्या जवळून गेले त्यावेळी ते रस्त्याच्या कामाची देखरेख करीत होते. महाराज जयमल सिंहजींनी माझ्याकडे इशारा करून बीबी रूक्कोंना म्हणाले की आपण या सरदारसाठी येथे आलो आहोत. बीबी रूक्को म्हणाली की यांनी तर तुम्हाला सत–श्री–अकाल देखील म्हटले नाही. महाराज जयमल सिंहजी म्हणाले,''यास कल्पना नाही, आजपासून चौथ्या दिवशी हा आपल्या सत्संगात येईल.'' खरोखरच चौथ्या दिवशी ते सत्संगात गेले.

महाराज सावन सिंहजींना त्यांचा एक मित्र म्हणाला की तुम्ही नेहमी साधू–संतांच्या शोधात असता, त्यांच्या भेटीने तुम्हाला आनंद होतो. पंजाबमधून एक साधू आले असून तुम्ही त्यांचा सत्संग ऐकल्यास बरे होईल. तेथे एक वेदांती योगी होता. तो योगी म्हणाला, ''ते नास्तीक लोक आहेत. त्यांच्याकडे अशी एक चमत्कारीक क्रिया केली जाते की ते डोक्यावर वाद्य ठेवतात आणि आवाज मात्र आतून ऐकू येऊ लागतो.'' महाराज सावन हसून म्हणाले, ''मी एक इंजिनिअर आहे. आजपर्यंत मी असे वाद्य पाहिलेले नाही की जे डोक्यावर ठेवल्याने आतून आवाज येईल.''

याचप्रकारे महाराज कृपालजींचा इतिहास तुम्ही वाचून पहा! महाराज सावन सिंहजींना भेटण्यापूर्वी सात वर्षे अगोदरच महाराज कृपालजींना त्यांचे अंतर्यात दर्शन होत होते. ज्या महात्म्यांनी स्वत: अनुभव घेतलेला असतो, ते आम्हांस सांगतात की आपण सतगुरूंना गाठू शकत नाही. महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''जीव अंध आहे तर परमात्मा डोळस आहे. जोपर्यंत

परमात्मा स्वत: आपणांस हाक मारून त्याचे बोट आपल्या हातामध्ये देत नाही, तोपर्यंत आपण त्याचे बोट पकडू शकत नाही, कारण आपण अंध आहोत. आपणांस काहीच दिसत नाही.''

मी स्वत:बद्दल सांगत असतो की मला महाराज कृपाल त्यांच्या भेटीच्या एक वर्षापूर्वी स्वामीजींच्या स्वरूपात अंतर्यात दिसत असत. त्यांच्या भेटीच्या काही दिवसांपूर्वीच ते स्वत:च्या रूपामध्ये मला दर्शन देऊ लागले.

महाराज कृपाल जेव्हा माझ्या आश्रमात आले तेव्हा त्यांना मी नम्रतेने विचारले की, महाराजजी! तुम्ही सुरवातीला भेटत होतात तेव्हा तुमच्या डोक्यावरील केस कापलेले होते, दाढीचे केस देखील कापून लहान केलेले होते. मी त्यांच्या संपूर्ण प्रतिमेचे वर्णन केले. परंतु संत कधीही स्वत:ला कोणत्याही गोष्टीचे श्रेय घेत नाहीत. ते म्हणाले,''होय! ही सर्व हुजूरांची कृपा आहे. मी जसा आहे तसा तुझ्याशेजारी बसलेलो आहे.'' गुरू नानक देवजी महाराज सांगतात:

भागहीन गुरु न मिले निकट बैठयां नित पास।

जर आपल्या नशीबात नसेल तर महात्मा भले आपल्या घरात जन्मास येवोत वा आपल्या शेजारी राहू लागोत, तरीही आपणांस विश्वास पटणार नाही की हे परिपूर्ण महात्मा आहेत. दूर-दूरून येऊन इतर लोकं महात्म्यांपासून फायदा करून घेतात व त्यांच्या जवळची लोकं मात्र तशीच राहून जातात.

तुम्ही गुरू नानकदेवजी महाराजांचा इतिहास वाचून खात्री करून घेऊ शकता की त्यांच्या नगरामधील सर्वात श्रीमंत सरदार राय बलार यांनी त्यांना ओळखले, परमेश्वर मानले. तसेच त्यांची बहिण नानकीनेही ओळखले की माझा भाऊ परमात्म्याचे स्वरूप आहे. परंतु गुरू नानकदेवजींचे आई-वडील मात्र ते काही कामधंदा करीत नाहीत म्हणून त्यांची मारहाण करीत असत. गुरू नानकदेवजींचे हृदय संसारिक गोष्टींमध्ये रमावे म्हणून अनेक उपाय केले गेले.

याचप्रमाणे स्वामीजी महाराज सांगतात की ज्यांच्यावर परमात्मा कृपा–दृष्टी करतो, त्यांनाच महात्म्यांचे दर्शन मिळते. त्यांचाच महात्म्यांवर विश्वास बसतो. ही गोष्ट सर्वांनी शांत अंत:करणाने विचार करण्यासारखी आहे. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

सतगुरु नू सबको देखदा जित्ता है संसार।
डिट्ठया मुक्त न होवी जिच्चर शब्द न धरे प्यार।।

सतगुरूंना सर्वच जण पाहतात. त्यांना पशु–पक्षी देखील पाहत असतात. असे नाही की पशू–पक्षांना संत दर्शनाचे फळ मिळत नाही. ते मनुष्य जन्माचे अधिकारी बनतात, नंतर ते कधीही मनुष्य योनीपेक्षा खालच्या योनीत जात नाहीत. परंतु तरीही मुक्ती नामातच आहे. त्यांना मुक्तीची एक संधी नक्की मिळते. परंतु पुढील जन्मात जर त्यांनी नाम घेतले, तर त्यांची त्याच जन्मात मुक्ती होते, नाहीतर ते राहून जातात.

जोपर्यंत आपण नाम घेऊन नामाची कमाई करीत नाही, सूर्य–चंद्र–तारे पार करून गुरू–स्वरूप आपल्या अंतर्यात प्रगट करीत नाही, तोपर्यंत आपण आपल्या जीवनकाळात मुक्तीचा दावा करू शकत नाही. जो मनुष्य नामाची कमाई करून आपल्या आत्म्यावरील स्थूल, सुक्ष्म आणि कारण ही तीनही आवरणे दूर सारून अंतर्यात गुरू स्वरूपास प्रकट करतो, केवळ तोच म्हणू शकतो की मी मुक्त आहे. हे असे आहे की वाण्याच्या नोंदवहीत आपले काही देणे–घेणे बाकी नसल्यास आपण त्यास म्हणू शकतो की आम्ही तुझ्याकडून सामान घेऊन यावे की नाही ही आमची मर्जी आहे.

जोपर्यंत आपण अंतर्यामध्ये जाऊन सतगुरू स्वरूप प्रगट करीत नाही, तोपर्यंत आपला सतगुरूंवर कधी विश्वास बसतो तर कधी नाही. कधी कसला विचार करतो तर कधी कसला! आपण द्विधा मन:स्थितीत असतो. त्यावेळी आपण गंगेकडे गेलो तर गंगाराम बनतो व जमुनेकडे गेल्यानंतर जमनुदास बनतो.

महाराज सावन सिंहजी सांगत असत की एखाद्याने स्वत:च्या डोळ्यांनी बैलास पाहिल्यानंतर सर्व जग जरी म्हणाले की तो बैल नसून म्हैस आहे, तरी तो विश्वास ठेवणार नाही, कारण त्याने आपल्या नेत्रांनी पाहिलेले असते की हा बैल आहे. एकदा का आपण अंतर्यात जाऊन पाहिले की हे परिपूर्ण महात्मा आहेत, परमेश्वराचे स्वरूप आहेत, हे दररोज मला अंतर्यात घेऊन जातात, मग त्यानंतर आपण साशंक कसे बरे राहू? आपले विचार दोलायमान स्थितीत राहतील का? स्वामीजी महाराज सांगतात,''असे महात्मा स्वत:च दया करतात आणि आपणांस दर्शन देतात.''

दर्श पाय सतलोक सिधारी। सत्तनाम पद कीन सही।।

संत-महात्म्यांच्या दर्शनाचा आपणांस असा फायदा होतो की जेथून आपला आत्मा दूरावून आलेला असतो, त्या ठिकाणी ते आत्म्यास पोहचते करतात, आपले प्रेम सच्चखंडाशी जोडतात. ते आपणांस सांगतात की, हे प्रिय शिष्या, हा तुझा देश असून, तुझा आत्मा येथेच राहणारा आहे. सतगुरू कधीच आपणांस अंधविश्वास वा खोटी आश्वासने देत नाहीत. ते सांगतात की तू नामकमाई करून अंतर्यात जाऊन पाहा! तुझ्याअगोदर जाऊन तुझ्यासाठी सतगुरू तेथे काय-काय तयारी करीत आहेत? परंतु बाहेरच बसून आपण हाय! हाय! करीत राहिल्यास त्यामध्ये सतगुरूंची काय चूकी आहे?

बाबा सावन सिंहजी सांगत असत,''जे लोक असे म्हणतात की सतगुरू स्वत:च आम्हांला सचखण्डास घेऊन जातील, तर त्यांनी समजावे की त्यांचे मन त्यांची फसवणूक करीत आहे. जो मुलगा स्वत:च्या वडिलांवर अवलंबून राहतो त्यास त्याचे मित्रदेखील टोमणा मारतात की हा स्वत:चा भार देखील वडिलांवर टाकत आहे. तसेच सत्संगी देखील अशा शिष्यास म्हणतात की तू स्वत:चा भार गुरूंवर घातलास व स्वत:चा सुधार केला नाहीस.''

महाराज सावन सिंहजी सांगत असत.''प्रियजनहो! तुम्ही माझ्यासाठी ध्यान-अभ्यासाची पुंजी जमा करून आणा, मला ध्यान-अभ्यासाची अत्यंत

गरज आहे.'' संत–महात्मा आपल्या शिष्यांकडून ध्यान–अभ्यासाचीच अपेक्षा ठेवतात. आपण प्रेमाने सांगता,''शाळेत जाणे विद्यार्थ्याचे कर्तव्य असते, पुढे त्यास शिकविणे शिक्षकाचे काम असते. आपली शाळा आपल्या दोन्ही डोळ्यांच्या मध्यभागी तीसऱ्या तिळावर आहे. आपल्या अध्यात्मिक प्रवासाची सुरुवात पायांच्या तळव्यांपासून सुरू होते व तीसऱ्या तिळावर संपते. जेव्हा आपण आपले लक्ष नव–द्वारांमधुन बाजूस सारून आपल्या नेत्रांमागे आणतो, तेव्हा तेथे आपले गुरू अगोदरच आपल्या प्रतिक्षेत उभे असतात.'' ते म्हणतात, ''शब्द–धुन पकड आणि वरच्या मार्गी चल.'' येथे पोहोचल्यावर सेवकाची ड्यूटी संपते, पुढे काय करावे हे गुरूंवर निर्भर असते ज्याप्रमाणे मुल शाळेत गेल्यावर त्यास शिकविणे व त्याची काळजी घेणे शिक्षकाचे काम असते.

सही नाम पाया सतगुरु से। बिन सतगुरु सब जीव बही।।

जोपर्यंत सतगुरू लाभत नाहीत, तोपर्यंत आपणांस माहित नसते की खरे नाम कोणते आहे? सर्वसाधारणपणे आपण आप–आपल्या भाषेत आप–आपल्या समाजातील शिकवणीनुसार कोणी परमात्म्यास अल्ला, कोणी राम, कोणी वाहे–गुरू तर कोणी राधास्वामी संबोधुन त्याचे स्मरण करतो.

महात्मा सांगतात की आपण या सर्व नामांचा इतिहास चाळून पाहू शकता की एखादे नाम शंभर वर्षे, एखादे नाम पाचशे वर्षे, एखादे नाम चौदाशे वर्ष जुने आहे तर एखादे नाम दोन हजार वर्षे जुने आहे आणि एखादे नाम दोन–तीन युग जुने आहे. रामचंद्रजी महाराज त्रेता युगात आले. ते संसारातून गेल्यानंतर आपण परमात्म्याचे राम या शब्दाने स्मरण करू लागलो. येशू क्रिस्टास संसारातून जाऊन दोन हजार वर्षे झाली आहेत, त्यानंतर आपण परमात्म्यास गॉड संबोधुन त्याचे स्मरण करतो. मोहम्मद पैगंबरांना या संसारात येऊन चौदाशे वर्षे झाली आहेत. आपण त्या परमात्म्यास अल्लाह संबोधुन त्याचे स्मरण करतो. गुरु नानक देवजी महाराजांना पाचशे वर्षे झाली आहेत. आपण त्या परमात्म्यास वाहे गुरू संबोधुन त्याचे स्मरण



करतो. स्वामीजी महाराजांना संसारात येऊन शंभर वर्षे झाली आहेत. आपण त्या परमात्म्यास राधास्वामी संबोधुन त्याचे स्मरण करतो.

खरे नाम लिहीण्या, वाचण्या व बोलण्यात येत नाही. आपण इतिहासात देखील त्या नामाचा शोध घेऊ शकत नाही कारण ते नाम पाचशे वर्षांपूर्वीचे किंवा दोन–तीन युगांपूर्वीचे नाही. त्या नामाने संसाराची रचना निर्माण केलेली आहे. त्या नामाच्या आधारेच खंड–ब्रम्हांड सक्रिय आहेत. संत आपणांस अशा उच्च नामाशी जोडतात. हजरत बाहु सांगतात,''ज्या 'कलमा' द्वारे मुक्ती होते ते जिभेद्वारे वाचले जाऊ शकत नाही. गुरू अशा नामाशी जोडतात ज्याचे स्मरण करताना ओठ हलत नाहीत, डोळे मिचकावत नाहीत.'' संत–सतगुरू खरेनाम देतात, त्या नामाने संसाराची रचना निर्माण केलेली आहे. गुरू नानक देवजी महाराज सांगतात:

उत्पत प्रलय शब्द होवे, शब्दे ही फिर उत्पत होवे।

आपण ते नाम प्राप्त करूनच तृप्त होऊ शकतो. गुरू साहेब सांगतात:

नाम मिले मन तृप्तिए, बिन नामें धृग जीवास।

नामाशी मिळाल्यावर आपणांस तृप्ती व शांती लाभते. नामाखेरीज आपले जीवन धृग म्हणजे व्यर्थ आहे, अर्थशून्य आहे. गुरूसाहेब सांगतात:

धृग धृग खाया धृग धृग कापड़ अंग चढ़ाया।

आपण सांगता नामाखेरीज आपण जे काही खाता–पीता, परिधान करता ते परमेश्वराच्या हिशोबात अर्थशून्य धरले जाते.

लेखे में सोई घड़ी बाकी के दिन बाद।

ज्या दिवशी नाम मिळाले, नामाशी आपला आत्मा जोडला गेला तोच दिवस हिशोबात धरला जातो. नाहीतर ज्याप्रमाणे पशू–पक्षी आयुष्याचे दिवस व्यतीत करून निघून जातात, त्याचप्रमाणे आपणही आयुष्यातील उरलेले दिवस व्यतीत करून निघून जाऊ.

जीव पड़े चौरासी भरमें। खान पान मद मान लाई।

परमात्म्याने अत्यंत दया करून आपणांस सर्व योनींमधील मुख्य योनी बनवून संसारात पाठविलेले आहे. गुरू साहेब सांगतात.

अवर योनि तेरी पनिहारी, इस धरती में तरी सिकदारी।

मनुष्याची योनी सर्व योनींमध्ये शिरोमणी योनी आहे. मोठ्या पदावरील मनुष्याची जबाबदारी देखील मोठीच असते. आपण केवळ मनुष्यजन्मातच परमात्म्याची भक्ती व परमात्म्यास प्राप्त करू शकतो. कुत्री–मांजरी, पशू–पक्षी देखील खातात–पीतात व गर्मी–थंडी अनुभूत करतात. मनुष्य देखील ते सर्व अनुभूत करतात. जन्म–मृत्यु पशू–पक्षांना तसेच मनुष्यांसही येतो.

मनुष्य आणि पशू–पक्षांमध्ये जर कोणता फरक असेल तर तो हाच की पशू–पक्षांच्या योनीत आपण परमात्म्यास प्राप्त करू शकत नाही, परमात्म्याची भक्ती करू शकत नाही. पशू–पक्षांमध्ये ती विवेक बुद्धी नसते ज्याजोगे चांगल्या व वाईट विचारांमधील अंतर जाणू शकेल. मनुष्यास ती विवेक बुद्धी आपल्या अंतरात निर्माण करावयास हवी ज्यामुळे त्यास चांगल्या व वाईट विचारांची पारख करता यावी. नामकमाईचे विचार चांगले असतात.

आपण सांगता की मोठ–मोठ्या जाती–जमाती व मोठ–मोठे हुकूमशहा या संसारात आले आणि शेवटी आपले हात मोकळे करून या संसारातून निघून गेले. हुजूर महाराज नेहमी महमूद गजनवीचा इतिहास समजावून सांगत असत की त्याने हिंदूस्थानावर सतरा–अठरा हल्ले केले. त्याने हिंदूस्थानातून प्रचंड धन–संपत्ती लुटूली. जेव्हा त्याचा अंतसमय आला तेव्हा त्याने आपल्या सहकाऱ्यांना म्हटले,''मी जे काही हिंदूस्थानातून लुटून आणले आहे, ते एका जागी सजवून ठेवा, मला पाहू देत की ती किती धन–संपत्ती आहे.'' तो ती सर्व सजवलेली धन–संपत्ती पाहून ओक्साबोक्शी रडला की मी या धन–संपत्तीसाठी लाखों महिलांना विधवा केले, लाखों मुलांना अनाथ केले परंतु आज या अवाढव्य धन–संपत्तीमधील एक कवडी देखील माझ्यासोबत जात नाही.

महमूद गजनवी म्हणाला, मी अंतसमयी आदेश देत आहे त्यावर सर्वांनी अमल करावा. मृत्युपश्चात माझ्या हाताचे तळवे खालच्या बाजूस करावे व हात शवाच्छादनातून बाहेर काढले जावेत. माझ्या बाबतीत जे काही घडेल ते मी भोगेनच परंतु कमीत कमी इतर लोकांनी तरी त्यापासून धडा घ्यावा की महमूद गजनवी जेव्हा संसारातून निघून गेला तेव्हा त्याचे दोन्ही हात रिकामी होते. माझ्या मृत्युपश्चात अशी घोषणा केली जावी की:

जुल्म साथ है खाली हाथ है।

आपण संसारातील मान–मोठेपणा व धन–संपत्ती प्राप्त करण्यासाठी आपला अनमोल हिऱ्यासमान मनुष्यजन्म व्यर्थ घालवून निघून जातो.

मान मनी का रोग पसरिया। बड़े बने जिन मार सही।।

मान–मोठेपणा प्राप्त करण्याचा रोग प्रत्येक मनुष्यास लागलेला आहे की मी जिथे जाऊ तेथे माझा आदर–सत्कारच व्हावा. सर्वांनी मला चांगला मनुष्यच म्हणावे. जे मोठे बनले त्यांना मार सहन करावा लागला. आपण रोजच पाहतो की संसारातील मान–मोठेपण कसे असते?

जनता जेव्हा एखाद्या व्यक्तीस मान–मोठेपणा देऊ इच्छिते तेव्हा ते काही पहात नाहीत, मिरवणूका काढतात, गळ्यात फुलांचे हार घालतात, स्तुतीस्तोत्र गातात, वर्तमानपत्रात बातम्या छापतात की हा खूप चांगला आहे, यात खूप चांगले गुण आहेत. नंतर जेव्हा अशी वेळ येते की सत्ता हातून निघून जाते, तेव्हा जे लोक फूलांचे हार घालत असत तेच दगड मारतात, शीव्या देतात आणि त्याच वर्तमानपत्रात निंदा–नालस्ती करू लागतात. महात्मा आपणांस प्रेमाने समजावतात की सांसारिक मान–मोठेपणा तर लोक इथेच आपल्याकडून हिरावून घेतात. मृत्युनंतर तर सर्वच सोडून जावे लागते. कबीर साहेब सांगतात:

जब जरिए तब होय भस्म तन रहे किरम दल खाई।

भले मनुष्य धिप्पाड असो वा सडपातळ असो मृत्युपश्चात त्यास जर अग्नीच्या सुपुर्त केले तर त्याची राख बनते व जर कबरीत पुरले तर तेथे त्यास कीडे खातात. कबीर साहेब सांगतात:

माटी कहे कुम्हार को तू क्या रोंदे मोह। इक दिन ऐसा आएगा मैं रोंदूगी तोह।।

कुंभार मातीची भांडी बनवित होता तेव्हा मातीने त्यास म्हटले की तू रोज मला पाणी घालून कालवण्यासाठी पायाखाली घालून तुडवतोस व माझ्यापासून भांडी बनवितोस. काय कधी तू ती वेळ आपल्या डोळ्यांसमोर ठेवली आहेस जेव्हा मी तुला अशाच प्रकारे माझ्यात सामावून घेईन. त्याचप्रमाणे एके दिवशी लोहार लाकडे जाळून कोळसे बनवीत होता तेव्हा लाकुड त्यास म्हणाले:

लकड़ी कहे लुहार को क्या जारे तू मोह। ईक दिन ऐसा आएगा मैं जारुंगी तोह।।

एक दिवस असा येईल जेव्हा मी तुला आपल्यासोबत जळवून कोळसा बनवेन. परमात्म्याने आपणांस बहुमुल्य मनुष्यजन्म दिला होता परंतु आपण हा मनुष्यजन्म मान–मोठेपणा प्राप्त करण्यात व्यर्थ गमावून निघून जातो. आपणांस ज्या परमात्मा–भक्तीच्या हेतूसाठी हा जन्म लाभला होता, आपण त्या परमात्म्याची भक्ती केली नाही.

छोटा रहे चित्त से अंतर। शब्द माहिं तब सुरत गई।।

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''जिभेने आपली नम्रता दर्शविणे एक प्रकारे फसवणूक असते. आपण शब्द–नामाशी एकरंग होऊनच नम्र बनू शकतो.'' प्रचंड नामाची साधना केलेले महात्मा या जगात आले, परंतु त्यांनी येथे येऊन कधीही गर्व केला नाही.

मी बाबा सावन सिंहजींच्या काळची स्थिती खूप जवळून पाहिली आहे. जर कोणी येऊन त्यांस म्हणत असत की तुम्ही आमचे अमुक–अमुक काम केले, आमचा सांभाळ केला तर आपण म्हणत असत,''होय! ही आमच्या

बाबाजींची दया आहे, हे सर्व बाबाजीच करीत आहेत.'' संत स्वत:स कोणत्याही गोष्टीचे श्रेय घेत नाहीत.

एका महिलेची दोन मुले होती. एक मुलगा दोन वर्षांचा होता आणि दुसरे मुल अजून आईच्या अंगावरील दूधावरच अवलंबून होते. आपणांस कल्पना आहे की कलीयुगात मुले लवकर जन्माला येतात. ती महिला ध्यानात बसली होती, तिला नाम मिळालेले होते. बाबा जयमल सिंहजी तिच्या जवळून जात असता त्यांच्या मनात विचार आला की या महिलेस गृहस्थी जीवनात किती कष्ट आहेत. हिचे एक मुल तर खूपच तान्हे आहे. ही मुले कधी रडू लागतील व कोणत्या क्षणी काय मागतील माहित नाही. तरीही ही महिला सतगुरू भक्तीत मग्न आहे. बाबा जयमल सिंहजींनी त्या महिलेपुढे आपले मस्तक टेकले की तू धन्य आहेस. एका व्यक्तीने विचारले की बाबाजी आपण हे काय करीत होता? आपण म्हणालात की संतांच्या हृदयात नामाची कमाई करणाऱ्यांचा खूप आदर असतो. इतरांना काय माहिती की हा काय करीत आहे?

आपण बाबा जयमल सिंहजींना विश्वेश्वर मानतो. ते विश्वेश्वर आहेत यात काही वादच नाही, परंतु विश्वेश्वर असूनही आपण एका ध्यान-अभ्यास करणाऱ्या महिलेच्या पाया पडलात. त्या महिलेस माहित नव्हते कारण ती ध्यानात बसली होती. नम्रतेने छोटे बनणे यासच म्हणतात. संत महात्मा सर्वोच्च असूनही छोटे व नम्र बनून रहातात.

शब्द बिना सारा जग अंधा। बिन सतगुरु सब भर्म मई।।

स्वामीजी महाराज सांगतात,''कोणत्या व्यक्तीचे नाव घ्यावे की हा डोळस आहे. मग तो कोणत्याही समाजात जन्माला आला असला परंतु जर त्यास गुरू मिळाले नसतील, शब्द-नाम मिळाले नसेल तर डोळे असूनही तो अंध आहे. त्याचा भ्रमच दूर होत नाही की मी कोठून आलो आहे व मला काय केले पाहिजे?'' गुरु अंगद देवजी महाराज सांगतात:

माया धारी अंधा बोला शब्द न सुणे बहो रोल घचोला।

अंतरात शब्द गुंजत आहे परंतु आपण त्यास ऐकू शकत नाही. अंतरात प्रकाश आहे परंतु आपण तो पाहू शकत नाही. नेत्र असूनही आपण अंध आहोत, कान असूनही आपण बहिरे आहोत.

शब्द भेद और शब्द कमाई। जिन जिन कीन्ही सार लई।

आता स्वामीजी महाराज सांगत आहेत,''प्रियजनहो, ज्यांनी शब्द–नाम प्राप्त करून नामाची साधना केली त्यांनीच अंतर्यात जाऊन सत्य पाहिले आणि सत्याचा संदेश दिला.''

मला अनेकदा संसारात जाण्याची संधी मिळाली आहे. मी नेहमी ही गोष्ट सांगितली आहे की ज्याने संतमत मार्गी लागून नामाची साधना केली व जो अंतर्यात गेला त्याने या मार्गास खोटा ठरविला नाही, उलट त्यास खरा मार्ग म्हणून संबोधले.

महाराज सावन सिंहजी सांगत असत की जर आपण डॉक्टरकडून औषध आणून कपाटात ठेवले, ते घेतले नाही, डॉक्टरच्या सांगण्यानुसार पथ्य पाळले नाही तर काय ते औषध गुणकारी ठरेल. मग जरी आपण डॉक्टरला दोष दिला तरी यात डॉक्टरची काय चूक?

आपली देखील हीच परिस्थिती आहे. आपण नाम घेऊन काम–वासनेचा त्याग करीत नाही, क्रोध सोडत नाही व इतर कोणतेही दोष त्यागण्यास तयार नसतो. तरीसुद्धा म्हणतो की आम्ही नाम घेऊन इतकी वर्षे झाली आहेत परंतु तरीही आमचा आंतरिक पडदा अजूनही उघडला नाही. विचार करून पहा, काय आपण गुरूंच्या उपदेशाचे पालन केले? त्यांनी दर्शवलेल्या मार्गावर चाललो?ज्यांनी शब्द–नाम प्राप्त करून त्याची साधना केली त्यांना त्यापासून लाभ झाला.

शब्द रता सतगुरु पहिचानों। हम यह पूरा पता दई।।

ज्या महात्म्यांनी आपल्या जीवनकाळात शब्द–नामाची साधना केली, देहाशी संघर्ष करून आपल्या आत्म्यास देहातून काढले, आपल्या गुरूंची दया प्राप्त केली तेच महात्मा आपल्याला पार करू शकतात. महात्मांनी आपल्या वाणीत उल्लेख केलेला आहे की कोणताही अपूर्ण व भोंदू गुरू आपली भेट परमात्म्याशी करू शकत नाही, तेव्हा आपण आंधळ्यांमागे लागू नये.

गुरु जिन्हां का अंधला सिख भी अंधे कर्म करेण।
ओह भाणे चलण आपणे नित झूठो झूठ बुलेण।।
अंधे दा राह दस्या अंधा होय सुजाय।
होय सुजाखा नानका सो क्यों औजड़ जाय।।

आंधळ्याने दर्शविलेल्या मार्गाने केवळ आंधळाच जाईल. डोळस मनुष्य त्या मार्गी कसा काय जाईल? आपण एखाद्या महात्म्यांच्या शरणी जाण्यापूर्वी त्यांचे जीवनचरित्र वाचून पहावे की काय त्याने दहा–वीस वर्षे नामाची कठीण साधना केली? काय त्याने देह सोडून ब्रह्मांडापर्यंत प्रगती केली? मी नेहमी सांगतो की निद्रावस्थेतील मनुष्याचा कधीच पडदा उघडत नाही मग भले त्याने कितीही पार्ट्या बनविल्या असोत व कितीही लोकांना आपल्या मागे लावले असो. हा रंग चार दिवसांचा असतो. कबीर साहेब सांगतात:

सुखिया सब संसार है खाए और सोए।
दुखिया दास कबीर है जागे और रोए।।

जर कमाई केल्या खेरीजच आंतरिक पडदा उघडत असता तर सर्व जगच महात्मा बनले असते. हा आपल्या आयुष्याचा प्रश्न असतो. आपण सर्वप्रथम पहा की या व्यक्तीने नामाची साधना केली आहे का? आपला देह सोडून ब्रह्मांडापर्यंत प्रगती केली आहे का? महात्मा कधीही सांगत नाहीत की तुम्ही अंध व्यक्तीच्या (ढोंगी गुरूच्या) मागे लागा. शब्दअभ्यासी महात्माच आपले भले करू शकतात.

खोलो आँख निकट ही देखो। अब क्या खोलूँ खोल कही।।

शब्दरूपी महात्मा कधीही असे सांगत नाहीत की परमात्मा समुद्रतळाशी निजलेला आहे किंवा पर्वताच्या शिखरावर बसलेला आहे. ते म्हणतात की तुमचा महात्मा तुमच्या अंतर्यात बसलेला आहे. तुम्ही तुमचे लक्ष बाह्यजगातून काढून अंतर्यात पहा तर खरे. महात्मा यापेक्षा जास्त स्पष्ट माहिती काय देऊ शकतात? कारण सर्वात निकट आपला देहच आहे. परमात्मा या देहात बसलेला आहे. हा देह एक सच्चे मंदीर आहे. महात्मा आपले लक्ष बाह्यजगातून काढून अंतर्यात जोडतात.

आगे भाग तुम्हारा प्यारी। नहिं परखो तो जून रही।।

आपण प्रेमाने सांगतात की पुढे आपल्या भाग्याचा प्रश्न असतो. महात्मा येऊन स्वत:स लपवून ठेवीत नाहीत. ते संदेश देतात की अंतर्यात वर चला! जर आपण महात्म्यांना ओळखू शकलो नाही तर ती आपली चूकी असते.''

महाराज सावन सिंहजींना काही प्रेमींनी सांगितले की संतांना आपली कोणती न कोणती खूण ठेवली पाहिजे म्हणजे लोकांना कळावे की हे संत आहेत. महाराजजी म्हणाले,''काय संतांनी बोर्ड लावून ठेवावा की आम्ही परिपूर्ण संत आहोत? या संसारात फुशारक्या मारणे योग्य आहे का?'' आपण नामकमाई करून अंतर्यात जाऊन पहा! एखाद्या वृक्षाचे फळ खाल्या नंतरच त्याच्या मधुरतेची कल्पना येते.

कहना था सोई कह डाला। राधास्वामी खूब कही।।

स्वामीजी महाराज सांगतात,''आम्हांस आपल्याला जे काही सांगायचे होते ते आम्ही सांगितले आहे. आता आपले कर्तव्य आहे की शब्द-नामाची साधना करून अंतर्यात जावे व सत्य स्वत: आपल्या डोळ्यांनी पहावे.''

स्वामीजी महाराजांनी आपणांस या लहानशा वाणीत खूप प्रेमाने समजावले की सर्वप्रथम सतगुरूंचा शोध घ्या, सतगुरूंच्या शरणी जा. सतगुरूंखेरीज नाम मिळत नाही व नामाखेरीज मुक्ती मिळत नाही. संत सतगुरू आम्हांस जवळात-जवळ आपल्या देहात असलेल्या परमात्म्याची माहीती देतात.

***



अमृतवेळ

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे ध्यानाच्या कार्यक्रमापूर्वी दिलेला संदेश
संतबानी आश्रम, १६ पी एस, राजस्थान – २९ सप्टेंबर १९९५

परमपिता परमात्मा सावन कृपालजींच्या चरणी नमस्कार आहे ज्यांनी गरीब आत्म्यावर दया केली, आपल्या भक्तीचे दान दिले व आपली भक्ती करण्याची संधी दिली. मी नेहमी सांगतो की भक्ती अनमोल धन आहे. आपण त्यास शेतात उगवू शकत नाही, पैशांच्या जोरावर विकत घेऊ शकत नाही किंवा सत्तेच्या जोरावर ते प्राप्त करू शकत नाही.

भक्ती धनास प्राप्त करण्याचे केवळ परमात्म्याची दया हे एकच माध्यम आहे. जेव्हा त्याची दया होते तेव्हा परमात्मा आपणांस मनुष्यजन्म बहाल करतो. आणखी दया करतो तेव्हा तो आपली भेट परिपूर्ण सतगुरूंशी करून देतो. जेव्हा परिपूर्ण गुरू दया करतात तेव्हा आपण त्यांच्या दयेचा अंदाज लावू शकत नाही की ते किती दया करतात. जेव्हा आपण त्यांच्या दयेला समजून त्यांनी दर्शविलेल्या मार्गावर चालतो तेव्हा आपल्याला आपोआपच समजते की खरोखरीच भक्ती अनमोल धन आहे. भक्ती खरी सुखदायक व सन्मानदेय आहे. भक्ती काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकाराची नाशक आहे.

परमात्म्याचे भक्त परमात्म्याहून मोठे नसतात. परंतु त्यांनी परमात्म्यास स्वत:वर प्रसन्न करून घेतलेले असते. प्रिय पुत्र आपल्या वडिलांकडून हवे ते प्राप्त करवून घेऊ शकतो. तो प्रिय पुत्र तेव्हाच बनू शकतो जेव्हा तो परमात्म्याच्या आज्ञेचे पालन करतो. ध्यान–नामस्मरण करणे म्हणजे इतर कोणावर उपकार करणे नव्हे तर स्वत:वर दया करणे आहे.

गुरूंनी दया केली भक्तीचे दान दिले. जेव्हा आपण स्वत:वर दया करतो, तेव्हा त्यांनी दर्शविलेल्या मार्गावर चालतो. आपण विचार करून पहा इथले प्रेमी आपल्याला वेळोवेळी सचेत करतात की आपण इथे–तिथे फिरू

नका, ध्यान–अभ्यास करा. सत्संगात सांगितलेल्या गोष्टींचा विचार करा किंवा नामस्मरण करा, परंतु आपण त्यांचे सांगणे ऐकत नाही. बहुतकरून इकडल्या–तिकडल्या गप्पा–गोष्टी करून निघून जातो.

महाराज सावन सिंहजी सांगत असत की प्रेमी आपणांस लंगरमध्ये भोजन देतात, आपली प्रत्येक बाबतीत काळजी घेतात. तर मग काय आपली ध्यान–अभ्यास करण्याची जबाबदारी नाही? आपल्या ध्यान–अभ्यासामुळे सेवा करणाऱ्यांना देखील काहीना काही लाभ मिळावा. आपण ज्या कामासाठी व ज्या उद्देशाने इथे आलो आहोत आपणांसही त्याचा लाभ मिळावा.'' माझे जीवन नामाच्या कमाईच्या अनुभवाने भरलेले आहे. आत्ताच प्रेमी भजन गात होते:

ठंड आत्मा किसे न पाई गौंदे फिरे जुबानी।

प्रियजनहो,ही बोरे नाहीत की मागितली तर मिळतील. गुरूंच्या आज्ञेपुढे स्वत:चे समर्पण करावे लागते. गुरू जे सांगतात सर्वप्रथम ते करावे लागते. मी नेहमी सांगतो की मला आज्ञा पालन करण्याचा अनुभव सैन्यात प्राप्त झाला. सैन्यात असा नियम असतो की सर्वप्रथम जेवण तयार करा व नंतर तक्रार करा की आम्ही डाळ, पीठ व विस्तवासाठी लाकडे कुठून आणू? मी हेच तत्व अंतरात बाळगून संतमताच्या मार्गावर वाटचाल करू लागलो.

बाबा बिशनदासजींनी माझे जीवन घडविले, मला दोन शब्दांचे नाम दिले. आपण जे सांगितले ते मी तना–मनाने केले. जेव्हा परमात्मा कृपाल आले त्यावेळी आपण जे काही सांगितले मी आपल्या दयेने ते करू शकलो कारण मी त्याश्रेणीतील व्यक्ती नव्हतो जे गुरूंच्या पुढे–मागे धावपळ करतात किंवा त्यांच्याशी चर्चा करण्यात पुढाकार घेतात. आपण गुरूंशी काय चर्चा करू शकतो? आपण आरशासमोर उभे राहून स्वत:ची स्तुती केली की मी किती सुंदर आहे. आपण जे आहोत तेच आरसा दाखवेल. आपणांस सर्वप्रथम गुरूंच्या आज्ञेचे पालन करावयास हवे.

जेव्हा परमात्मा कृपाल माझ्या घरी आले त्याच्या एका दिवसा पूर्वी माझे काही नातलग माझ्याकडे आले, आमच्या नात्यातील एक लग्नसमारंभ होता. आपणांस कल्पना आहे की लग्नसमारंभात येणारे वऱ्हाडी लोक आपल्यापुढे कशाप्रकारे आपल्या गरजा मांडतात. सर्वप्रथम त्यांनी घरातील अंगणात उभे राहून भरपूर सतनाम–सतनामचे गायन केले. मी त्यांस म्हटले पुढे या, तुम्हांस काय पाहीजे?

मी जेव्हापासून साधू बनलो मी नातलगांकडे जाण्याचा प्रयत्न केला नाही. जर एखादा नातलग माझ्याकडे आला तर मी त्याच्याशी तेवढेच बोललो जेवढे भक्ती मार्गात उचित आहे. मी सदैव गुरू नानक देवजी महाराजांचे वाक्य लक्षात ठेवले:

भक्तां ते संसारियां दा जोड़ कदे न आया।

भक्त आणि संसारिक लोकांचा कधीच मेळ बनत नाही. त्या नातलगांनी चार–पाच तास थांबून माझ्यापुढे आपल्या मागण्या मांडल्या, मी गप्प राहीलो. इतक्यात महाराज कृपालजींचा संदेश आला की,''घरी रहा, मी तुझ्याकडे आज येईन.'' आपण विचार करा, कोणी त्यांना माझे नाव सांगितले? त्यापूर्वी मला ना त्यांचा कोणी प्रशसंक भेटला होता ना कोणी निंदक भेटला होता.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''संत दीनदयाल असतात. एखादा मनुष्य जर दीन बनत असेल तर ते जरूर दया करतात. संत अंतर्यामी असतात परंतु ते सेवकाचे सत्य स्वरूप उघडकीस आणत नाहीत, उलट त्यास म्हणतात की तू चांगला आहेस, आणखी चांगला बन.'' आपण जेव्हा हे त्यांच्या मुखातून ऐकतो तेव्हा आपण चांगले मनुष्य बनण्याचा प्रयत्न करतो. आपण इतकी पापं करूनही गुरू आपणांस म्हणतात की तू चांगला आहेस. महाराज कृपालजींच्या समजावण्याची पद्धत अशा प्रकारची होती की आपण एका व्यक्तीशी बोलत असत परंतु बाजूला उभा असलेला दुसरा मनुष्य भीतीने कापत असे.

जेव्हा महाराज कृपाल आले तेव्हा आपण सर्वप्रथम मला विचारले की, ''हां बंधु, तुझा ध्यान–अभ्यास कसा चाललाय?'' मी आपल्या जीवनात खूप ध्यान–अभ्यास केला. माझ्या जीवनात पहिल्यांदाच मला असे कोणी विचारले होते की तुझा ध्यान–अभ्यास कसा चाललाय? मला कविता रचण्याची सवय होती. मी आपणांस अत्यंत प्रेमाने म्हटले:

आए लक्खां ही परौणें पर ऐसा कोई आया ना।
आपों आप सब दस्सी किसे भजन कराया ना।
गोंदे तुर गए सब आपदे ही गौंणे।
भाग जागे साडे वीरनों साडे आए ने सन्त परौणें।।

जो कोणी माझ्या जीवनात आला तो स्वत:चे स्तुतीस्तोत्र गाऊन निघून गेला परंतु जे मला गायचे होते ते केवळ भाग्यानेच मिळते.

ठंड आत्मा किसे ना पाई गौंदे रहे जुबानी।
अजायब कृपाल बिना कौंण सी विचारेया।।

त्यांनी माझ्यावर दया केली. दयावान दया करण्यासाठी सदैव तयार असतो परंतु आपण दया ग्रहण करण्याचे पात्र कितपत तयार केलेले आहे याचा प्रश्न असतो. त्या दयाळू सावन–कृपालजींच्या महिमेचे मी काय वर्णन

करू ज्यांनी आपणांस अनमोल भक्तीचे धन बहाल केले. भक्ती खरी सुखदायक व सन्मानदेय आहे. फरीद साहेब सांगतात:

उठ फरीदा सुत्तयां झाड़ू दे मसीत। तू सुत्ता रब जागदा तेरी डाढ़ी केही प्रीत।।

आपण संसाराच्या दिशेने जागृत आहोत व परमात्म्याच्या दिशेने निजलेलो आहोत. सर्व संतांनी हाच उपदेश दिलेला आहे की उठा, जागृत व्हा! सर्वात सच्ची मस्जिद, मंदीर, ठाकूरद्वारा आपला देह आहे. आपण बाह्यजगातील मस्जिद, मंदीर व ठाकूरद्वारा यांचा आदर करतो कारण आपण स्वत:च्या हातांनी ते बनविले आहेत. आपण तेथे धूप देतो, दीप प्रज्वलीत करतो व तेथे कोणतेही दुष्कर्म करीत नाही. परंतु ज्या मस्जिद, मंदीर, गुरूद्वारा मध्ये आपण बसलेलो आहोत ते स्वत: परमात्म्याने बनविलेले आहेत. आपण त्यास नामस्मरणाच्या झाडूने स्वच्छ करणे गरजेचे आहे. आपल्या आत्म्यावरही विषय–विकारांची जळमटे व केरकचऱ्याचा खूप मळ चढलेला आहे. नामस्मरण त्यावर झाडूचे काम करते. फरीद साहेब सांगतात:

हौं बलिहारी पंखियां, जंगल जिन्हा वास। कंकर चुगन थल वसन, रब न छड्डन पास।।

जंगलात पशू–पक्षी रहातात ज्यांना खाण्यासाठी चांगले अन्न मिळत नाही, त्यांना रहाण्यासाठी चांगली घरं वा बिछाने नाहीत, तरीही ते पहाटे मनुष्य उठण्यापूर्वी जागृत होतात व आप–आपल्या बोलीत परमात्म्याचे स्मरण करतात परंतु आपण त्यावेळी झोपलेलो असतो. मनुष्य उत्तमोत्तम घरांमध्ये रहातात, स्वादिष्ट मेवा खातात. मनुष्याची जबाबदारी आहे की त्याने परमात्म्याचे आभार मानावे.

जसे मी काल समजावले होते की ध्यान–अभ्यासात बसण्यापूर्वी पंच–पवित्र नामांचे नीट स्मरण करा. ध्यान–अभ्यासास ओझे समजू नका, तो प्रेमाने व आवडीने करा. जेव्हा उठण्यासाठी आवाज दिला जाईल तेव्हाच ध्यानातून उठा. आपले नामस्मरण सुरू करा.

***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील
संत बानी आश्रम, राजस्थान व दिल्ली येथील सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या अपार दयेने संत बानी आश्रम, १६ पी एस राजस्थान येथे त्यांच्या मधुर आठवणीत सत्संगाचा कार्यक्रम निम्नलिखीत दिवशी आयोजित केला जात आहे.

३१ मार्च २०१६ ते २ एप्रिल २०१६

दरवर्षाप्रमाणे बाबाजींच्या मधुर आठवणीत दिल्ली शहरात खालील पत्यावर सत्संगाचा कार्यक्रम निम्नलिखीत दिवशी आयोजित केला जात आहे.

२० ते २२ मे २०१६

कम्युनिटी हॉल, भेरा एन्क्लेव, पश्चिम विहार,
(पीरागढ़ी चौक जवळ) नवी दिल्ली ११० ०८७

राकेश शर्मा – ९८१०२१२१३८, सोनू ९८१०७९४५९७ सुरेश चोपडा ९८१८२०१९९९

सर्व बंधू–भगिनींनी कार्यक्रमात सहभागी होऊन नामस्मरणाचा व संतवचनांचा लाभ घ्यावा. कार्यक्रमात जाण्याचा उद्देश लक्षात ठेऊन तेथील वेळापत्रकाचे पालन करावे ही नम्र विनंती.

***